# आयआयएममध्ये भारताच्या नवीन पिढीचे प्रतिबिंब

## डॉ. प्रमोद सावंत यांचे गौरवोद्गार

◆ नागपूर, १३ नोव्हेंबर

कौशल्य व मनुष्यबळ विकासासाठी गोवा सरकारला आयआयएम नागपूर संस्थेशी जुळायला आवडेल कारण आयआयएम नागपूर म्हणजे भारताच्या नवीन पिढीचे खरे प्रतिबिंब होय, असे गौरवोद्गार गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी काढले. त्यांनी आयआयएमला भेट दिली, त्यावेळी ते बोलत होते.

इथली एकंदर रचना विद्यार्थ्यांना प्रगत भारताचे स्वप्न पूर्ण करायला पूरक आहे, या शब्दात त्यांनी संस्थेची प्रशंसा केली. स्थानिक औद्योगिक प्रतिनिधींशी संवाद साधताना ते म्हणाले, इलेक्ट्रॉनिक्स व आयटी सेक्टरमधील



मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्यासोबत डॉ. भीमराया मेत्री

उद्योगधंद्यांसाठी गोवा सरकार माफक किमतीत जमीन उपलब्ध करून देऊ इच्छित आहे. नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळाचा करण्यात येणारा विकास सर्व घटकांना जोडणारा राहील.

तसेच नागपूर-गोवा चौपदरी महामार्ग हा या दोन राज्यांतील दळणवळणातला उत्तम दुवा ठरेल. नवीन विमानसेवा व चौपदरी महामार्गामुळे प्रवाशांची संख्या वाढणार आहे.

यावेळी त्यांनी मंगेश सरदेशपांडे लिखित 'आरोग्य संपदा' पुस्तकाचे प्रकाशन केले. डॉ. सावंत यांच्यासारखा तडफदार मुख्यमंत्री लाभल्याने गोवा राज्य जलद गतीने प्रगती करत आहे, असे गौरवोद्गार आयआयएमचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांनी काढले.

◀(तभा वृत्तसेवा)